# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ३८ वा ❑ भारतीय सौर दिनांक २६ फाल्गुन शके १९४७, मंगळवार दि.१७ मार्च २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## संच मान्यतेसाठी वैध आधार कार्डची अनिवार्यता?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

संच मान्यतेसाठी आधार कार्ड अनिवार्य करणे तांत्रिक अडचणींमुळे वादग्रस्त  ठरत आहे. त्यामुळे आधार नसलेले विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात, जे शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधात आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आधारअभावी विद्यार्थ्याला शिक्षणापासून वंचित ठेवता येत नाही.शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे आधार नसलेल्या विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी दाखवून शिक्षक अतिरिक्त होत आहे

पारदर्शकतेसाठी ते गरजेचे असले तरी, ग्रामीण भागात तांत्रिक समस्यांमुळे हे पूर्णपणे योग्य मानले जात नाही; कारण यामुळे शिक्षक अतिरिक्त होऊ शकतात आणि शाळांचे नुकसान होऊ शकते.

नुकतेच वर्धा जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने सन २०२५-२६ च्या संच मान्यतेनुसार  खाजगी अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधील आधार  अवैध ठरल्याने अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची

यादी प्रसिद्ध केली आहे.या यादीनुसार वर्धा जिल्ह्यात ९५ शिक्षक व १४४ शिक्षकेतर कर्मचारी अशा एकूण १४४ जणांवर अतिरिक्त होण्याची वेळ आली आहे.

संच मान्यतेसाठी आधार कार्डची  अट मान्य,ही बाब समर्थनीय मात्र आधार कार्ड  वैध ही बाब समर्थनीय मात्र आधार अवैध ठरत असेल तर शिक्षकांचा दोष कसा? अनेक विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड वरील नाव,जन्म तारीख, लिंग आदी चुकांमुळे विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड मीचमॅच होत आहे. शाळांमध्ये आधार कार्ड साठी कॅम्प देखील लावण्यात आलेले आहे,या कॅम्प मध्ये विद्यार्थ्यांची अनुपस्थिती,तांत्रिक अडचणी यामुळे आधार वैध ची समस्या अनेक शाळांमध्ये निर्माण झाली,मात्र त्याचा फटका शिक्षकांना बसत आहे,ज्याचे समर्थन करणे अनुचित आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आधार नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारता येणार नाही असे स्पष्ट केले आहे, ज्यामुळे आधार सक्ती चुकीची ठरू शकते. अनेक विद्यार्थ्यांकडे अद्याप आधार कार्ड नाही किंवा त्रुटी आहेत, ज्यामुळे पटसंख्येवर परिणाम होतो.  बनावट पटसंख्या रोखण्यासाठी आणि पारदर्शकतेसाठी आधार अनिवार्य करणे योग्य मानले जाते,मात्र तांत्रिक अडचणीमुळे आधार अवैध मुळे शिक्षकांना अतिरिक्त ठरविणे न्याय ठरत नाही.

विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड वैधतेच्या  प्रश्नामुळे सध्या महाराष्ट्रातील शिक्षक आणि शिक्षण विभाग मोठ्या संकटात सापडले आहेत. आधार तपशिलातील त्रुटींमुळे लाखो विद्यार्थी सरकारी रेकॉर्डवर अवैध ठरत असून, याचा थेट परिणाम शाळांच्या संचमान्यतेवर आणि पर्यायाने शिक्षकांच्या पदांवर होत आहे.

आधार कार्ड अवैध ठरल्यामुळे किंवा अपडेट नसल्यामुळे राज्यात साधारणपणे ५ ते १० लाख विद्यार्थी तांत्रिकदृष्ट्या शाळाबाह्य ठरण्याची शक्यता आहे. ज्या विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेले नाही, त्यांना शालेय पोषण आहार, मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तके यांसारख्या सरकारी लाभांपासून वंचित राहावे लागू शकते. आता सरल ऐवजी यूडायस प्लस (+ ) पोर्टलवर माहिती भरणे सक्तीचे केले आहे. त्यामुळे  विद्यार्थ्यांच्या नावात, जन्मतारखेत किंवा स्पेलिंगमध्ये आधार कार्ड आणि शालेय रेकॉर्डमध्ये तफावत असल्याने मोठी संख्या इनव्हॅलिड दिसत आहे.

शिक्षक संघटनांचा पवित्रा

शिक्षक संघटनांनी या निर्णयाचा तीव्र विरोध केला असून, आधार अनिवार्य करणे हे शिक्षण हक्क कायद्याच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे.

आधार कार्ड अनिवार्य करणे हे पारदर्शकतेसाठी योग्य मानले जात असले तरी, व्यावहारिक आणि कायदेशीर दृष्ट्या, यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका असल्याने या निर्णयावर टीका होत आहे.

# आता साहित्यिकांना जोडा

## सोमण, निफाडकर, महाळंक यांचे अभिनंदन; महाराष्ट्र साहित्य परिषदेत पदांचा उलटफेर

ज्योतिर्मय साहित्य

जळगाव - महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप)  लक्षवेधी निवडणुकीत प्रमुख पदांच्या निकालात उलटफेर झाला आहे. प्रस्थापित म्हणून पदांवर बसलेल्या मिलींद जोशी - सुनिताराजे पवार - विनोद कुळकर्णी यांचा थेट पराभव करीत अध्यक्षपदी योगेश सोमण, कार्यवाहपदी स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्षपदी प्रदीप निफाडकर हे विजयी झाले. मसाप ची निवडणूक महत्त्वाची मानली जाते कारण अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (अभामसासं) भरविण्याचा अधिकार या संस्थेकडे आहे. अर्थात, याच संमेलनातील विचारधारेच्या विरोधात इतरही मराठी साहित्य संमेलने होत असतात. तरीही अभामसासं आयोजन व ते यशस्वी करण्याची प्रक्रिया प्रतिष्ठेची मानली जाते. आता नियोजित अभामसासं हे शतक पूर्ण करणारे असून ते पुण्यात आयोजित केले जाईल. त्यामुळे या शतकी संमेलनाच्या निमित्ताने मसाप मधील एककल्ली - एकांगी - हेकेखोर पदाधिकारी पायउतार व्हावेत म्हणून सोमण - निफाडकर - महाळंक यांच्या साहित्य संवर्धन आघाडी ने अत्यंत सावधपणे व्यूहरचना करून निवडणूक जिंकली. परिवर्तन उत्कर्ष आघाडीचे जोशी - पवार - कुळकर्णी पराभूत झाले. गेली दहा वर्षे सुरू असलेली त्यांची मनमानी संपुष्टात आली.



साहित्य संवर्धन आघाडीची बांधणी पुण्यातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजप विचारधारा असलेल्या नेत्यांनी केली असा आक्षेप जोशी - पवार - कुळकर्णी यांनी केला होता. एका व्हिडीओ कॉन्फरन्समधील संवादाचे काही चित्रीकरण सोशल मीडियात टाकून आमच्या सर्वसमावेशक विचारधारेच्या विरोधात ही मंडळी आहेत असे भासवायचा प्रयत्न तिघांनी केला. हे करीत असताना त्यांनी पुण्यातील भाजप नेते राजेश पांडे याचे नाव समोर आणले. खरे तर या पहिल्या चुकीच्या भूमिकेमुळे त्यांनी स्वतःच्या पराभवाचे खड्डे खोदले. आजवर मसाप ची निवडणूक ही साहित्याशी संबंधित घटकांशी संबंधित असायची. त्याकडे कोणी लक्ष देत नसे. पण संघ व भाजपचे नाव घेतल्याने समाजातील सर्वच घटक सक्रिय झाले. मसापसाठी मतदार कोण ? ही उत्सुकता वाढली. याशिवाय,  जोशी - पवार - कुळकर्णी मसाप ची निवडणूक कधी घ्यायचे ? ते फारसे चर्चेत येतात नसे.

जळगाव जिल्ह्यातील मसाप मतदार यादी मी पाहिली. एकूण

**कव्हरस्टोरी**



डॉ. दिलीप तिवारी, जळगाव
मो. 95525 85088

११२८ मतदार दिसले. मराठी साहित्याशी संबंधित एवढे साहित्यिक आहेत ? याचाच मला धक्का बसला. माझे गाव भडगाव तेथे ५४ मतदार दिसले. कोण आहेत हे साहित्यिक ? मलाच प्रश्न पडला. चाळीसगावला सर्वाधिक ५३४ मतदार दिसले. तेथील मतदारांची नावे वाचली. जवळपास २०० वर मतदार हे मतदार शाळा - महाविद्यालयाच्या शिक्षण संस्थेशी संबंधित नवरा - बायको - मुले आहेत हे लक्षात आले. भडगाव येथेही एकाच घरातील मंडळींची नावे दिसली. या मतदारांचा मसाप शी मतदार म्हणून संबंध काय ? कोणत्या निकषाने हे मतदार आहेत ? माझी तीन पुस्तके प्रकाशित आहेत. एकाला मराठी साहित्य संस्कृती मंडळाचा पुरस्कार आहे, पण मला कधीही कोणी मसापचा सभासद करून घेतले नाही ? अशा प्रश्नांच्या उत्तरातून जोशी - पवार - कुळकर्णी यांच्या जिल्हानिहाय पंटरांनी मनाप्रमाणे सभासद नोंदणी केल्याचे समोर आले. ही पंटर मंडळी कोणत्या कुवतीची आहे, याचा अनुभव अमळनेर येथे दोन वर्षांपूर्वी झालेल्या साहित्य संमेलन आयोजनवेळी आला होता. संमेलनाचे बोधचिन्ह दृश्यकलेच्या प्रकारात अगदीच टुकार पद्धतीने चितारले गेले होते. त्यावर प्रचंड टीका होऊनही पंटरांनी त्यात बदल करण्याचा शहाणपणा दाखवला नव्हता. अगदीच भिक्कार बोधचिन्ह तेव्हा वापरले गेले. अशी हलकी वैचारिक कुवत असलेली पंटर मंडळी जोशी - पवार - कुळकर्णी यांनी जिल्हावार वाढविली होती.

जोशी - पवार - कुळकर्णी विरोधात सोमण - महाळंक - निफाडकर यांच्या विजयाची बांधणी अत्यंत सावधपणे सुरू झाली. निफाडकर - राजेश पांडे - राजेंद्र नन्नवरे यांच्यामुळे मी निवडणूक प्रक्रियेत जोडला गेलो. संघ परिवार - भाजप संघटन हे अशा इंटेरेस्टच्या विषयात सतत सक्रिय असतात. एक एक मत मिळवायचे कसे ? याचे नियोजन करतात. निफाडकर हे पत्रकारितेत माझे शिक्षक व सहकारी आहेत. मला त्यांच्यासाठी फिरायचे होते. पांडे - नन्नवरे यांचा आग्रह मी मोडू शकत नव्हतो. जोशी - पवार - कुळकर्णी यांनी विनाकारण संघ - भाजपला ओढले. त्यांनी ते मनावर घेतले आणि मतदान प्रक्रिया पूर्ण करून घेतली. निकाल बरोबर उलटफेर करणारा आला. सोमण - महाळंक - निफाडकर यांचे मनःपूर्वक  अभिनंदन.

आता शेवटी महत्त्वाचा मुद्दा. शतकी मराठी साहित्य संमेलन पुण्यात होईल. यानिमित्त राज्यात एकूण ९९ मराठी संमेलने घेण्याचे राजेश पांडे यांनी सूचविले आहे. म्हणजेच सर्व जिल्ह्यांमध्ये २३ लहान मोठी मराठी साहित्य संमेलने होवू शकतात. तसे ठरले असेल तर ती झाली पाहिजेत. ९९ इतर संमेलने व १०० वे संमेलन पुण्यात, हा विचार दूरदृष्टीचा आहे. मराठी लोकांना - मनाला एकत्र आणणारा आहे. जिल्हावार संमेलनामुळे मराठी साहित्यात लेखनासह दृश्यकला प्रकारात आशय निर्मिती करणाऱ्या नव्या दमाच्या लेखक - कण्टेट क्रिएटर मंडळींना सोबत जोडता येईल. मसाप ची मतदार यादी अद्ययावत करता येईल. राज्यात सरकार भाजप - शिंदेसेना - राष्ट्रवादी (स्व. अप) यांचे आहे. शंभरावे मराठी साहित्य संमेलन अनेक विक्रम नोंदविणारे, नवे पायंडे पाडणारे होवू शकते.

सोमण - महाळंक - निफाडकर यांच्यासह पांडे - नन्नवरे यांनी यावर विचार करायला हवा.

# घर अजूनही तसंच आहे....

ज्योतिर्मय साहित्य

माझा आईपणाचा प्रवास
ओम-सोहमसोबतचे चौदा वर्ष.....

घर अजूनही तसंच आहे
पण मुलं मात्र मोठी होत आहेत

घर बदललेलं नाही. त्या भिंतींचे रंग अजूनही तेच आहेत, दार अजूनही त्याच ओळखीच्या आवाजात उघडतं, आणि पहाटेचा तो निष्ठुर गजरही आजही त्याच वेळी ओरडतो. किचनमध्ये चहाचा सुगंध आजही तसाच दरवळतो... पण या सगळ्यात काहीतरी खूप शांतपणे, कोणालाही न विचारता बदलत चाललंय - माझी मुलं मोठी होत आहेत.

आईच्या मनात वेळ जणू कुठेतरी अलगद थांबलेली असते. आठवणींच्या त्या हळव्या कोपऱ्यात मी अजूनही त्या क्षणातच जगते  ज्या दिवशी ओम आणि सोहम या दोन लहानशा जीवांनी माझ्या कुशीत येऊन पहिल्यांदा श्वास घेतला. त्यांच्या त्या पहिल्या रडण्याने माझ्या आयुष्याला एक नवं अर्थपूर्ण सूर लाभला. त्या दिवसापासून माझ्या प्रत्येक श्वासात, प्रत्येक स्वप्नात ही दोन्ही लेकरं सामावली.इंजिनिअर म्हणून महापारेषणच्या ग्रीडमधून वाहणाऱ्या विजेचा प्रवाह सुरळीत राहावा याची काळजी घेणारी मी त्या दिवशी मात्र एका वेगळ्याच प्रकाशाने उजळून निघाले होते. आयुष्यभर तांत्रिक गणितं सोडवणारी, आकड्यांमध्ये गुंतलेली माझी बोटं त्या दिवशी चार इवल्याशा हातांना अलगद धरताना नकळत थरथरली होती. कारण त्या छोट्याशा स्पर्शात मला आयुष्याचं सगळ्यात कोमल आणि अनमोल सत्य जाणवलं होतं - जुळ्या मुलांची आई होण्याचं....

राज आणि मी आम्ही दोघांनी मनात एक छोटंसं, साधं स्वप्न जपलं



होतं - प्रेमाने भरलेलं घर, हसऱ्या क्षणांनी उजळलेलं आयुष्य. पण ओम आणि सोहम या दोन चिमुकल्या जीवांनी आमच्या त्या स्वप्नाला फक्त रंगच दिले नाहीत तर त्याला धडधडणारं हृदय दिलं.

त्या दिवसापासून आमचं घर केवळ भिंतींनी उभं असलेलं घर राहिलं नाही ते आमच्या दोन लेकरांच्या हसण्याने, त्यांच्या गोड गोंधळाने आणि त्यांच्या निरागस स्पर्शाने जिवंत झालेलं एक छोटंसं, प्रेमाने धडधडणारं विश्व बनलं....

सकाळची ती धावपळ आता नुसती सवय उरली नाहीये, तर ते माझ्या जगण्याचं गाणं झालंय. माझ्या स्वयंपाकघरातून येणारा तो डब्यांचा

**सीमा गाडेकर-खंडेलवाल**
मो.८५५४९९५०३७

लयबद्ध आवाज, एकामागोमाग एक पाण्याने भरल्या जाणाऱ्या बाटल्यांची ती लगबग, आणि त्या गलबल्यात उमटणारी माझी ती एक साद... या सगळ्या गोंधळातच माझं प्रेमाचं विश्व सामावलेलं आहे. माझ्या शेजाऱ्यांसाठी ही कदाचित रोजची कटकट असेल, पण माझ्यासाठी मात्र हा घराला घरपण देणारा आनंदाचा सोहळा आहे!

आणि त्यात माझी हाक....

''ओम सोहम उठा रे आता! बास झाली झोप, शाळेला उशीर होईल.''कधी कधी ते अजूनही पांघरूण ओढून लपण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा त्यांच्या त्या विस्कटलेल्या केसांवरून हात फिरवताना वाटतं, का रं मुलांनो, इतक्या लवकर मोठे झालात? कालपर्यंत ज्यांचे पाय पाळणाघरात वळताना रडत होते, ते आज स्वतःच्या आयुष्याची दिशा ठरवायला सज्ज झाले आहेत.

दिवसभर ऑफिसच्या जबाबदाऱ्या सांभाळून जेव्हा संध्याकाळी घरी येते, तेव्हा थकवा उंबरठ्यावरच विरून जातो. जेव्हा एखादा म्हणतो, ''मम्मी, आज भाजी सॉलिड झाली होती, मित्रांनी शॉर्ट ब्रेक मध्येच माझा डबा फस्त केला!'' तेव्हा वाटतं, जगातील सगळ्यात मोठं प्रमोशन मला याच शब्दांत मिळालं आहे.

पण आता काळ झपाट्याने पुढे सरकतोय. १६ मार्च २०२६ पासून त्यांच्या दहावी शिक्षणाचा नवा प्रवास सुरू होणार आहे हा विचार करताना मनात एक वेगळीच भावना दाटून येते अभिमानाची आणि थोड्याशा हळवेपणाची..

''कधी कधी रात्रीच्या शांततेत घराकडे पाहताना डोळे भरून येतात. आज या घरात आवाजांची गर्दी आहे, भांडणांच्या लडी आहेत, अभ्यासाच्या चर्चा आहेत. पण उद्या? उद्या जेव्हा ही पाखरं शिक्षणासाठी आपलं घरटं सोडून दूर जातील, तेव्हा हे घर कसं दिसेल?''

कदाचित तेव्हा कानांत फक्त जुन्या आठवणींची वर्दळ असेल.

मी आणि राज, आम्ही दोघेच असू... आणि हे घर पुन्हा एकदा फक्त भिंतींचं होईल. कारण घराला घरपण हे सिमेंटने नाही, तर मुलांच्या त्या गोड गोंधळाने येतं.म्हणूनच, आज मी त्या सकाळच्या घाई मध्ये आणि दगदगीमध्ये पण आनंद शोधतेय. त्यांच्या विखुरलेल्या पुस्तकांमध्ये, त्यांच्या डब्यात उरलेल्या शितांमध्ये आणि त्यांच्या छोट्याशा तक्रारींमध्ये... कारण मला ठाऊक आहे, उद्या त्यांची हीच चिवचिव माझ्यासाठी दुर्मिळ होणार आहे.मला मुलगी तर नाही पण मुलीची उणीव भासू नये इतकं प्रेम या दोघांनी दिलं. मुलं मोठी झाली, तरी आईसाठी ती कधीच मोठी होत नाहीत. ती आजही माझ्यासाठी तेच  लहान बाळं आहेत...

वेळ आपला प्रवास करतच राहील दिवस सरतील, वर्षं बदलतील, आणि माझी मुलं त्यांच्या स्वप्नांच्या विशाल आकाशात उंच भरारी घेतील. त्यांच्या आयुष्याला नवे मार्ग, नवी स्वप्नं सापडतील. पण माझ्या हृदयातला आईपणाचा  एक कोमल कप्पा मात्र कायम याच घरात थांबून राहील त्यांच्या त्या लहानपणीच्या हसण्यात, गोड गोंधळात, आणि प्रत्येक निरागस क्षणात.काळ कितीही पुढे गेला तरी त्या आठवणींची ऊब कधीच कमी होणार नाही. कारण जगातल्या कुठल्याही आईसाठी मुलांचं बालपण कधीच संपत नाही ते तिच्या मनात कायम जपलेलं राहतं ... एका गोड आठवणीसारखं...

राजसोबत उभं राहिलं आमचं
प्रेमाने विणलेलं सुंदर घर,

ओम-सोहमच्या हसण्यात फुलला
प्रत्येक क्षण निरंतर.

उद्या स्वप्नांच्या विशाल नभात
घेतील ते उंच भरारी,

पण माझ्या आईपणाच्या हृदयात
राहतील तेच चिमुकले गोजिरी.




## जात्यावरच्या ओव्या......

लई मन वंगाळ
काही बाही चिंतित
भला बुरा इचार
बारो महिने करत ||५४६||

मन माकड माकड
उड्या मारत चालल
नही ठह्यरत एका जागी
लई सांगून पाह्यला ||५४७||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक – भाग ७





ज्योतिर्मय साहित्य


माणसाला स्तुती आवडते परंतु जेवढ्या सहजतेने आपण स्तुतीचा स्वीकार करतो तेवढ्याच सहजतेने निंदेचा करू शकत नाही. त्यासाठी धैर्य लागते. म्हणूनच समर्थ म्हणतात मना बोलणे नीच सोशीत जावे. या ठिकाणी धैर्याचा आणि टीका सहन करण्याचा दुसराही एक अर्थ घेता येईल. तो म्हणजे मनावर संयम राखणे, प्रतीक्षा करणे. प्रत्येकाच्या जीवनामध्ये काही एक काळ असा येतो की त्या प्रसंगामध्ये त्याला मनावर संयम ठेवून कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागते. आजच्या पिढीत हा संयम, हे धैर्य कमी होताना दिसते आहे. तरुण अपयशाचा स्वीकार आणि अपमानाचा सामना सहजपणे करू शकत नाहीत. जी गोष्ट आपल्याला हवी आहे ती मिळायलाच हवी ती नाही मिळाली तर ते एक तर खचून जातात किंवा हिंसक बनतात. अशी अनेक उदाहरणे आपण व्यवहारात पाहतो. म्हणूनच धैर्य अंगीकारणे, अपमान सहन करणे याचे प्रशिक्षण मनाला देणे आवश्यक आहे. ती वृत्ती अंगी बाणवावी लागते. मुलांना सुद्धा आई-वडिलांनी कठीण परिस्थितीचा सामना करणे, संकटात खचून न जाणे आणि अपयश आले तरी त्यातून पुन्हा उभे राहण्याची हिंमत ठेवणे या गोष्टी शिकवायला हव्यात. क्रिकेटसारख्या किंवा अन्य खेळांमधूनही अशा प्रकारची वृत्ती आपल्याला शिकायला मिळते. एखादा सामना हरला तरी निराश न होता, खेळाडू पुढचा सामना कसा जिंकता येईल त्या तयारीला लागतात. या सगळ्या गोष्टींमध्ये यश आणि अपयश सहजपणे कसे स्वीकारायचे याचे सुंदर शिक्षण आपल्याला मिळते.



जीवनामध्ये वागताना नम्रतेने बोलणे आवश्यक आहे. तसे संस्कार लहानपणापासून व्हायला हवेत ओल्या मातीच्या गोळ्याला हवा तसा आकार देता येतो म्हणूनच पालकांनी तसे आपल्या मुलांना संस्कार द्यायला हवेत. ही नम्रता आतून घ्यायला हवी. ती मनाची वृत्ती व्हायला हवी. बऱ्याच वेळा आजच्या कार्पोरेट जगामध्ये काही लोक कृत्रिम नम्रता किंवा विनय धारण करताना दिसतात. परंतु त्या गोष्टी मनापासून नसतील तर त्या गोष्टी म्हणजे एक प्रकारचे ढोंगच !

श्रीकृष्ण, श्रीराम यांचे सर्वांशी वागणे-बोलणे कसे होते हे पालकांनी गोष्टीतून मुलांना शिकवायला हवे. त्यांच्याजवळ ज्ञान होते, सामर्थ्य होते. परंतु तरी देखील त्यांनी आपली नम्रता सोडली नाही. संत तुकाराम महाराज म्हणतात,“ नम्र झाला भुता, त्याने कोंडीले अनंता.“ त्याचे तात्पर्य हेच आहे. आपल्या बोलण्याने दुसऱ्याचे समाधान झाले पाहिजे, दुसरी व्यक्ती संतुष्ट झाली पाहिजे अशा पद्धतीने बोलता आले पाहिजे. आपले म्हणणे दुसऱ्याला न दुखवता देखील उत्तम पद्धतीने सांगता येते. या गोष्टी वरील महापुरुषांच्या उदाहरणांकडे पाहिले तर आपल्या सहज लक्षात येतात. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन




उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

तर भगवत गीता फळाची अपेक्षा न धरता कर्म करायला सांगते. दोन्ही वेगवेगळे विषय आहेत ते समजून घेणे महत्त्वाचे आहे. ज्या वस्तुंचे जिथे स्थान असते तिथे ते शोभून दिसते. आपल्याकडे संपूर्ण भारतभर नानातिर्थे आहेत. प्रत्येक तिर्थाचे स्थान महात्म्य हे वेगवेगळे आहे तुम्ही तिरूपतीला जाऊन बालाजीचीच सेवा पूजापाठ केला पाहिजे. काशीला गेला तर विश्वनाथाची पूजा केली पाहिजे हे सर्व असले तरी आपल्या धर्मग्रंथात विविधतेत एकता आहे हे मात्र निःसंदिग्ध आहे. वैदिक कर्मानुष्ठान करणारा व कर्म संन्यास घेणारा हे दोन्ही पूर्ण पुणे वेगळे आहेत. अमृता समोर ताकाची स्तुती शोभत नाही. तशी एखाद्या तज्ञांच्या समोर नर्तकी आणून काय उपयोग. किंवा एखाद्या भिका-याला लालूच दाखवतात पण संपन्न माणसाला त्याचे काय कौतुक असणार ?

## नामाचे सूक्ष्म स्वरूप



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नुसते ‘राम राम’ म्हणून राम कसा भेटेल हा प्रश्न माणूस सहजच विचारतो, आणि त्याला दाखला म्हणून म्हणतो की, समजा एखादा मनुष्य ‘नोकरी नोकरी’ असा जप करीत खोलीत बसला, तर त्याला नोकरी मिळणे शक्य आहे का ? वरकरणी हा दाखला अगदी बेमालूम दिसतो खरा, पण थोडासा विचार केला, तर तो इथे मुळीच लागू पडत नाही, असे कळून येईल. जो दाखला द्यायचा, आणि ज्या बाबतीत तो द्यायचा, त्यांचे गुणधर्म सारखे असावे लागतात. ‘रामनाम’ आणि ‘नोकरी’ यांचे परिणाम एकमेकांविरूद्ध आहेत. ‘राम राम’ म्हणण्याचा शेवट रामप्राप्तीत म्हणजे स्वतःच्या विस्मरणात होत असतो; म्हणजे देहबुद्धीतून देहाच्या पलीकडे जाणे, म्हणजे स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे, हा ‘ राम राम ’ म्हणण्याचा परिणाम. परंतु नोकरीचा प्रकार याच्या अगदी विरुद्ध आहे. मुळात नोकरी ही कल्पना सूक्ष्म आहे. नंतर, ती मिळावी म्हणून दहाजणांचे आर्जव करायचे, त्याच्यानंतर ती देणारा भेटायचा, आणि मग आपण ती नोकरी करायची. म्हणजे नोकरी या कल्पनेतून, सूक्ष्मातून, स्थूलात जाणे हा नोकरीचा प्रकार. पण ‘राम राम’ म्हणणे हा प्रकार स्थूलांतून सूक्ष्माच्याही पलीकडे जाण्याचा आहे.

यावरून, नोकरीचा हा दाखला इथे लागू पडत नाही हे स्पष्ट होते. दुसरी गोष्ट म्हणजे ‘नोकरी नोकरी’ असा जप करून नोकरी मिळणे कठीण हे तर खरेच, पण ‘राम राम’ म्हणून राम मिळणे कसे सोपे, किंबहुना कसे हमखास शक्य आहे हे पहा. नोकरी म्हणजे मुळात कल्पना असून, ती प्रत्यक्षात आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींची कशी जुळवाजुळव करावी लागते, हे आपण आत्ताच पाहिले. तसेच, घर बांधणे ही कल्पना; ती पुरी करून ते घर सर्व बाजूंनी सुखसोयीचे आगर व्हावे या हेतूने सर्व जिनसा पैदा करून त्यात आणून ठेवणे, म्हणजेच कल्पनेतून कृतीत येण्याचा प्रकार झाला. आता हे करणे किती कष्टाचे आणि अनिश्चीत आहे याचा अनुभव सर्वांना आहे. ‘राम राम’ म्हणण्याचे उद्दिष्ट, स्थूलांतून सूक्ष्माच्या पलीकडे जाणे हे आहे; म्हणजेच, अगदी सर्व बाजूंनी परिपूर्ण आणि भरलेले घर एकेक वस्तू फेकून देऊन रिकामे करण्यासारखे आहे. ही गोष्ट करण्याची इच्छा असल्यास कोणालाही सहज होण्यासारखी आहे. तेव्हा ‘नोकरी नोकरी’ म्हणून नोकरी मिळणे जितके कठीण, तितकेच ‘राम राम’ म्हणून राम मिळणे निश्चीत आहे. सबब ‘राम राम’ म्हणून राम कसा भेटेल अशी शंका न घेता ‘राम राम’ जपावे.

मनाच्या सर्व दुःखाला कारण देहबुद्धी आहे. ती जायला उपाय एकच: प्रेमाने भगवंताचे नामस्मरण करावे. त्याच्या योगाने सर्व मल जाईल. नामस्मरणच रामाची गाठ घालून देईल. चित्तात तशी तळमळ मात्र पाहिजे. ‘मी’ पणा टाकावा आणि परमात्म्याचे होऊन राहावे.

जो नाम घेतो त्याला देहाच्या सुखदुःखाची जाणीव राहणार नाही. तो आनंदात राहील.




पुढे....

संतानी आत्म देवाला समजावून सागितले पण उपयोग झाला नाही. त्याच्या हट्टा पुढे कांहीं चालले नाही.शेवटी संतानी एक फळ दिले व ते धुंधुळीस खायला दे. धुंधुली कजाक व विचित्र होती. तिने असा विचार केला की आपण हे फळ खाल्ले तर आपण गरोदर होऊ, मग त्याचा त्रास होईल,अशा वेळी चोर आले व मागे लागले तर आपण कसे पळावे? नंतर मुलाचा त्रासच असेल, असे म्हणून तिने बहिणीच्या सल्ल्या नुसार ते फळ गाईला खाऊ घातले. तिची बहिणही गरोदर होती तिने तिचे मूल धुंधुळीस देण्याचे कबूल केले.धुंधुळीने गरोदर असल्याचे नाटक केले. ते फळ खाऊन गायही गरोदर राहिली. गायीला, गाई सारखे कान असणारा मानव पुत्र झाला. माणसा सारखा पण कान गाईचे म्हणुन त्याचे नाव गोकर्ण असे ठेवले. धुंधुळीस ठरल्याप्रमाणे बहिणीने तिचे मूळ दिले. त्याचे नाव धुंधुकारी ठेवले. धुंधुकारी वाईट प्रवृत्तीचा होता. गोकर्ण सात्विक होता.तो ज्ञान मिळवायला बाहेरगावी गेला.धुंधुकारी आई वडिलांना रोज त्रास देई. मारपीट करी.

प्रपंचातील प्रतिकुलता असेल तर ती भगवान आध्यात्मिक उन्नतीसाठी देतो हे लक्षात आले पाहिजे.

गोकर्ण आई वडिलास सांगत असे, तुम्ही वनात निघून जा.धुंधूकारीचा त्रास सहन करू नका.त्यापेक्षा भगवत भक्तीत रहा.

आपल्याला जर गावातल्या लोकांनी हाकलून दिले, चोरीचा आळ घातला, अशी संकटे ही देवाचा अनुग्रह आहे. प्रापंचिक प्रतिकुलता ही पारमार्थिक अनुकूलता असते. क्रमश :.........



## ॥ अभंग-माधव ॥

माधव मनोहर जोशी
दादर, मुंबई.
मो. 9833159630



आजचा हा दिन । आहे सोनियाचा ।
मान राखू त्याचा । सदोदित ॥१॥
चला उभारूया । विजयाची गुढी ।
पाळूया ही रुढी । निरंतर ॥२॥
असे हा आपुला । नववर्ष दिन ।
होऊ सारे लीन । देवापाशी ॥३॥
गुढी उभारूनी । जागवू चैतन्य ।
दूर होवो दैन्य । सकलांचे ॥४॥
अयोध्येत आज । परतला राम ।
मारूनी तमाम । दुर्जनांना ॥५॥
गुढी उभारूनी । करूया स्वागत ।
सज्जन संगत । धरू आता ॥६॥
धरूनिया कास । ज्ञान विज्ञानाची ।
प्रगती सर्वांची । नित्य होवो ॥७॥
माधव हा देई । सर्वांना शुभेच्छा ।
पुऱ्या होवो इच्छा । सकलांच्या ॥८॥




# लाकडी घाणा तेल खाऊयात निरोगी राहुयात

ज्योतिर्मय साहित्य

जागतिक स्तरावरील एका सर्वेनुसार भारतामध्ये आजच्या काळात हृदयविकाराची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने तरुण वयातील मुलामुलींना सुद्धा आजकाल हार्ट अटॅकचे प्रमाण जास्त प्रमाणात दिसून येते. यामध्ये हृदयविकाराची अनेक कारणं असली तरी जे मुख्य आणि प्रबळ असं कारण पुढे येते ते म्हणजे, आपण रोज वापरत असलेले पॅकबंद किंवा डबाबंद खाद्यतेल होय.

असे सांगितले जाते की, हे अगदी नामांकित कंपन्यांचा खाद्यतेलाचा वापर आपल्या आहारामध्ये असला, तरीसुद्धा आपल्याला हृदयविकार या गंभीर आजाराचा धोका निर्माण झाल्याचे दिसून आले. आजच्या काळात, भारतामध्ये सर्वात जास्त विदेशी तेलाची आयात केली जाते. याशिवाय यामध्ये प्रामुख्याने मलेशिया या देशातील पामोलिन या खाद्यतेलाची सर्वात जास्त प्रमाणात आयात केली

हे भारतात पामतेल नावाने ओळखले जाणारे या खाद्यतेलाची किंमत भारतामध्ये फक्त २० ते २२ रुपये प्रति लिटर असल्याचे सांगितले जाते. इतकेच नव्हे तर, या पामतेलाचा उपयोग करण्यासाठी भारतामध्ये काही तेल कंपन्या हे पाम तेल लाखो-करोडो लिटर, दर महिन्याला आयात करत असतात आणि आपल्या कंपनीच्या खाद्यतेलात हे पामतेल मोठ्या प्रमाणात मिक्स करतात.

यामध्ये सूर्यफुलाच्या , रेणुकाच्या, कोकोनट ऑइल मध्ये अगदी मोहरीच्या आणि तिळाच्या खाद्यतेलाचे उत्पादन करण्यास मोठया कंपन्यां याचा वापर करत आहेत. तसेच हे पामतेल इतर तेलामध्ये न समजण्यासारखे मिसळून, डबल रिफाइन करून हे विकलं जात आहे. या पेक्षा भयंकर गोष्ट म्हणजे, या जगातील कोणताही देश या पामतेलाचा खाण्यासाठी उपयोग करत नाही. कारण पामतेलाचे उपयोग प्रामुख्याने हा वेगवेगळ्या उद्योगधंद्यांमध्ये केला जातो.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

असे सांगितले जाते की, हे तेल मलेशिया मध्येही खाण्यास बंदी आहे किंवा वापरले जात नाही. या तेलाच्या पूर्वी भारतामध्ये मोहरीचे किंवा तिळाच्या तेलाचे किंवा खोबरेल तेलाचे उत्पादन चांगलं होत असल्याने याचा वापर आपल्या खाद्य पदार्थमध्ये होत असतो, तसेच हे तेल १००% नैसर्गिक असल्याने लोकांमध्ये आजारी पडण्याचे प्रमाण कमी होते.

पण सध्या पामतेल स्वस्त असल्याने भारतीय कंपन्यांना आकर्षित करते आणि म्हणून हे स्वस्तातल्या पाम तेलाची मोठ्या प्रमाणावर आयात केली जाते. परिणामी मोहरी आणि तीळ उत्पादन करणाऱ्या शेतकरी वर्गाला याचा मोठा फटका बसला आहे. याशिवाय सर्वात जास्त तोटा हा हे पामतेल खाणाऱ्यांना होत आहे.

काही वर्षांपूर्वी हे पामतेल कोणत्याही इतर तेलामध्ये मिक्स करण्यास कायद्याने बंदी होती. मात्र जागतिक स्तरावरून काही करारानुसार भारतावर दबाव वाढवला गेला आणि मग भारताने आधुनिक कायद्यानुसार हे पामतेल इतर तेलामध्ये मिक्स करण्यास परवानगी दिली.

या तेलामध्ये ट्रान्सफॅट्स नावाचा एक घटक असतो. या घटकामध्ये एक प्रकारची अशी चरबी असते की, जी कोणत्याही तापमानाला विरघळत नाही, तुम्ही कितीही व्यायाम केलात तरी ही चरबी कमी होत नाही. ट्रान्सफॅट्स अशाप्रकारे आपल्या शरीरामध्ये साठत राहतात.

## आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





### वेताळ कथा ५

पुढे.......

“ज्याने संकटाच्या क्षणी स्वतःचा जीव धोक्यात घालून तिचे रक्षण केले, तोच अधिक योग्य आहे. कारण त्या क्षणी त्याने स्वतःचा विचार केला नाही.”
हे उत्तर ऐकताच वेताळ हसला आणि पुन्हा झाडावर जाऊन लटकला.
ही कथा आपल्याला एक सूक्ष्म प्रश्न विचारते:
संकटात आपण पहिले विचार करतो की पहिले कृती करतो? जीवनात कधी बुद्धी आवश्यक असते, तर कधी धैर्य. पण जेव्हा करुणा जागृत होते तेव्हा मन कर्तव्याकडे आपोआप वळते.
शांतपणे स्वतःला विचारावे मी एखाद्याला मदत करताना कर्तव्य म्हणून करते की मनापासून?
“करुणेने प्रेरित कर्तव्य हेच खरे धर्मकार्य आहे.”
मनाचा पाच स्तर
वेताळ कथा ५ मध्ये मनाचा पाचवा स्तर – “कर्तव्य आणि करुणा यांचे संतुलन” दिसते
पहिला स्तर : स्वार्थ माझे सुख, माझा लाभ.
दुसरा स्तर : भावना दुसऱ्याबद्दल करुणा किंवा प्रेम निर्माण होणे.
तिसरा स्तर: धैर्य संकटात पुढे जाण्याची तयारी.
चौथा स्तर :कर्तव्यबुद्धी जे योग्य आहे ते करण्याची जाणीव.
पाचवा स्तर : कर्तव्य + करुणा यांचे संतुलन
जिथे मन स्वतःचा विचार न करता दुसऱ्याचे रक्षण करते. अश्या विचारांच्या पायऱ्या उघड करणारी ही कथा नुसती कथा नसून मार्गदर्शन आहे
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# कर्मयोगिनी महिला संस्थेच्या पत्रलेखन स्पर्धेत विभावरी कुलकर्णी प्रथम









**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : कर्मयोगिनी महिला संस्थेच्या तर्फे घेण्यात आलेल्या पत्रलेखन स्पर्धेत विभावरी कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल त्या म्हणाल्या मला ज्या पत्रासाठी पुरस्कार मिळाला ते पत्र माझ्या गुरु संत मॅडम यांना लिहिले होते.

याचे श्रेय मी मुख्यत्वे दोन आदरणीय व्यक्तींना देऊ इच्छिते. एक म्हणजे या स्पर्धेची माहिती ज्यांनी दिली आणि तू लिहिच! असा प्रेमळ धाक आणि आग्रह धरला त्या ज्येष्ठ भगिनी पद्मावती कुलकर्णी. आणि दुसरी व्यक्ती म्हणजे आदरणीय गुरु लेखक श्री. विश्वास देशपांडे. पत्र लेखनासाठी ज्या स्त्रियांना पत्र लिहायचे होते त्याच्या विषयाची निवड मा. सरांनी केली. आणि आपल्या गुरूंना पत्र लिहावे हे सुचवले. त्यामुळे हे पत्र जरा वेगळे ठरले. या दोघांची मी ऋणी आहे.

यासाठी आपणा सर्वांच्या शुभेच्छा व आशीर्वाद पाठीशी होतेच. काल पासून खूप जणांना ते वाचायचे होते. म्हणून ते पत्र या सोबत जोडत आहे.

आदरणीय मॅडम,

सप्रेम नमस्कार.

आज तुम्ही आमच्यात देहरूपाने नसलात, तरी तुमची आठवण आल्याशिवाय एकही दिवस जात नाही. आपली पहिली भेट झाली तेव्हा जणू काही जन्मांतरीचे ऋणानुबंध असावेत, असा भास झाला होता. तुमच्या भेटीमुळे कोड्यासारखे गुंतागुंतीचे वाटणारे माझे आयुष्य एखाद्या सुंदर फ ुलासारखे उलगडत गेले. तुम्ही मला आयुष्याचा खरा उद्देश समजावून सांगितलात आणि त्यामुळेच मला जीवनाची एक नवी दिशा सापडली.

आज मी जी काही यशस्वी रेकी मास्टर आहे, ते केवळ तुमच्यामुळेच. तुम्ही दिलेली दीक्षा, तुमची शिकवण आणि तुम्ही करून घेतलेली प्रात्यक्षिके माझ्या यशाचा पाया ठरली. तुमच्या मार्गदर्शनाखाली मी विविध ध्यानाचे (मेडिटेशन ) प्रकार शिकले. तुमच्या सान्निध्यात आल्यावरच मला जाणीव झाली की माझी ज्ञानाची झोळी किती रिकामी होती. प्रत्येक शिष्याला समान वागणूक आणि समान ज्ञान देण्याची तुमची वृत्ती आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी होती.

रेकीचा खरा अर्थ आणि या पवित्र प्राणशक्तीचा उपयोग कसा करावा, याचे पूर्ण ज्ञान तुम्ही मला दिलेत. पंचमहाभूते, त्यांची उपयुक्तता आणि त्यांची ऊर्जा कशी प्राप्त करावी, हे तुम्ही आम्हाला प्रत्यक्ष अनुभवातून शिकवलेत. रेकीचा उगम आणि त्यामागचे शास्त्र तुम्ही इतक्या सोप्या पद्धतीने समजावून सांगितले की, त्यामुळेच मला आज समाजसेवेची संधी प्राप्त झाली आहे. तुम्ही दिलेल्या शिकवणीचा उपयोग मी आज लोकांसाठी करत आहे आणि त्याचे सकारात्मक परिणामही दिसून येत आहेत.

कृतज्ञतेत कसे राहावे, आभार मानण्याचे महत्त्व काय असते, चराचर सृष्टीशी स्वतःला कसे जोडून घ्यावे आणि भूतदया कशी असावी, सर्वात राहून अलिप्त कसे असावे, लोभ – मोह दूर कसे ठेवावेत, निरपेक्ष वृत्तीने सेवा कशी करावी.

हे संस्कार तुम्ही माझ्यावर बिंबवलेत. आजही एखादा कठीण प्रसंग समोर उभा ठाकला की, तुमच्या नोट्स आणि तुमची शिकवण मला मार्ग दाखवते. आजही मनातल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या आठवणींतून मिळतात. आपल्यात गुरु–शिष्या पलीकडचे एक अतूट नाते निर्माण झाले होते. आपण दोघींनी मिळून मेडिटेशनवर एक पुस्तक लिहायचे ठरवले होते, पण काळाने ती इच्छा अपूर्णच ठेवली.

तुमची शिकवण आणि तुमचे आशीर्वाद सदैव माझ्या पाठीशी आहेत, याची मला खात्री आहे. ते आशीर्वाद असेच कायम लाभोत, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

सदैव आपल्या कृतज्ञतेत,

**तुमची शिष्या,**
**विभावरी**

# डिपेक्स २०२६ प्रकल्प स्पर्धेमधे एमआयटी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे यश

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : सृजन ट्रस्ट आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ५ मार्च ते ८ मार्च २०२६ दरम्यान एमआयटी महाविद्यालयाच्या परिसरात आयोजित राज्यस्तरीय ''डिपेक्स २०२६'' या प्रकल्प स्पर्धेमधे एमआयटी पॉलिटेक्निक छत्रपती संभाजीनगरच्या विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या संघाने एनर्जी (ऊर्जा) संकल्पना गटामधुन द्वितीय क्रमांक पटकावला.




चंचल सोमवंशी, मानसी जाधव, अंकुश गाडेकर आणि संस्कृती भुसारी यांचा समावेश असलेल्या संघाने हायब्रिड सेल्फ चार्जिंग इलेक्ट्रिक सायकल युजिंग रिजनरेटीव्ह अँड सोलर एनर्जी असा प्रकल्प या स्पर्धेत मांडला होता. सायकल चालवतांना त्यामधून ऊर्जेची निर्मिती करून ती ऊर्जा लिथीयम आयर्न बॅटरीमध्ये साठवण्या बरोबरच सायकलला सोलर पॅनल बसवून त्यातून निर्माण होणारी ऊर्जासुद्धा बॅटरी मध्ये साठवता येते ज्याच्या माध्यमातून सायकल स्वयंचलित करता येते. सोबतच बॅटरीच्या उपयोगातून मोबाईल सुद्धा चार्ज करता येतो हे या प्रकल्पाचे खास वैशिष्ट्य आहे.

विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विभागप्रमुख प्रा व्ही पी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या प्रकल्पाची निर्मिती केली. सध्याच्या काळात ज्वलंत ठरलेल्या इंधनाच्या समस्येवर विद्यार्थ्यांची पारंपरिक ऊर्जास्रोताचा उपयोग करून वाहनाला स्वयंचलित करण्यासाठीची कमीत कमी खर्चातील ही संकल्पना परीक्षकांना आणि प्रदर्शनाला भेट देणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना प्रशंसनीय वाटली. डिपेक्स २०२६ च्या राज्यस्तरीय स्पर्धेचे हे ३६ वे वर्ष होते ज्यामध्ये राज्यातील विविध विभागातून ४०० हून अधिक संघांनी सहभाग घेतला होता. ११ विविध संकल्पना वर आधारित प्रकल्प या स्पर्धेत प्रदर्शित झाले होते, यासर्व प्रकल्पामध्ये एम आय टी पॉलिटेक्निक च्या संघाने द्वितीय क्रमांक मिळवून प्रशंसनीय यश मिळवले.

ग्रा. शि. मंडळाचे अध्यक्ष डॉ वाय ए कवडे, एमआयटीचे महासंचालक प्रा मुनिश शर्मा, संचालिका प्रा बी एम देशमुख, संस्थेचे प्राचार्य डॉ एस जी देशमुख, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



# पुस्तक समीक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे : अभिज्ञान, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली दोन दिवसीय ऑनलाईन पुस्तक समीक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. ही कार्यशाळा १४ व १५ मार्च २०२६ रोजी संध्याकाळी माध्यमातून आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत पुस्तक परीक्षणाची शास्त्रीय पद्धत, चिकित्सक वाचन तंत्र तसेच परीक्षण लेखनाची रचना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच परीक्षण लेखन करताना कोणत्या बाबींकडे लक्ष द्यावे आणि परीक्षण विविध माध्यमांत कसे प्रकाशित करता येते याचीही माहिती सहभागींना देण्यात आली.

कार्यशाळेदरम्यान सहभागींसाठी प्रत्यक्ष पुस्तक परीक्षण लेखनाचा सरावही घेण्यात आला. त्यामुळे पुस्तकांचे चिकित्सक वाचन आणि प्रभावी परीक्षण लेखनाची प्रक्रिया समजून घेण्यास सहभागींना मदत झाली. कार्यशाळेत विद्यावाचस्पती चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर, संचालिका सौ. मानसी सोनपेठकर यांनी मार्गदर्शन केले.

इयत्ता अकरावीपासून पुढील विविध वयोगटातील विद्यार्थी, शिक्षक, संशोधक आणि साहित्यप्रेमींनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



# ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचा महिला दिन उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – संसारामध्ये पुरुषांचा विश्वास आणि पाठिंबा असली की, त्या बळावरच महिला समाजामध्ये प्रगती करु शकतात असे प्रतिपादन डॉ. धनश्री सोनवणे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित महिला दिनानिमित्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. शनिवार दि. १४ रोजी स्व. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रभागातील भाजपाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे, सुप्रसिद्ध लेखिका, कवियत्री गीतांजली जोशी, गायिका, गीतकार आणि संगीतकार भारती न्यायाधीश, पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरोळ तसेच पी. के. इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. धनश्री सोनवणे यांचा शाल श्रीफळ आणि गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संस्थापक संदिप काटे, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार, सचिव सखाराम ढाकणे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शकुंतला शिंदे यांनी केले. महिला दिनानिमित्ताने विवेकानंद लिगाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. विजया तारे यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मला कासार यांनी केले तर भामिनी महाले यांनी आभार मानले. रेखा येळंमकर यांनी कविता सादर केली. सुरेखा पाटील यांनी महिला गीत गायले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शोभा राजगुरे, विमल मोंढेकर, अशोक येळंमकर, सुभाष विधाते, रमेश चांडगे, अशोक कलाल आदि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.







## म्युच्युअल फंडाचे प्रकार

मित्रांनो आज आपण म्युच्युअल फंडाचे मुख्य प्रकार पाहणार आहोत. हे प्रकार मुख्यतः म्युचल फंड कोणत्या प्रकारच्या असेट क्लासमध्ये इन्व्हेस्ट करतात त्यावरून पडतात. शेअर मार्केटमध्ये इन्व्हेस्ट करतात ते इक्विटी फंड.
डेट सेक्युरिटीज मध्ये इन्व्हेस्ट करतील ते डेट फंड. शेअर मार्केट तसेच डेट सेक्युरिटीज दोन्हीही ॲसेट क्लासमध्ये इन्व्हेस्ट करतील ते बॅलन्स फंड.
याव्यतिरिक्त थोड्या अवधीच्या डेट सेक्युरिटीज मध्ये जे फंड इन्वेस्ट करतात त्यांना लिक्विड फंड असे संबोधले जाते. या सर्व फंडांचे टॅक्स संबंधीचे नियम व टॅक्सचे प्रमाण वेगळे वेगळे आहे.
वर नमूद केलेल्या चार प्रकारच्या फंडांचे पुढे आणखी काही प्रकार होतात जसे इक्विटी फंडाचे काही प्रकार असे आहेत. लार्ज कॅप फंड, मिडकॅप फंड, स्मॉल कॅप फंड, लार्ज अँड मिडकॅप फंड, स्मॉल अँड मिडकॅप फंड, इत्यादी इत्यादी.
इक्विटी फंडाचे आणखी काही प्रकार असेही आहेत. उदाहरणार्थ बँकिंग फंड, फार्मा फंड, डिफेन्स फंड, सर्विसेस फंड, इत्यादी या फंडांना सेक्टर स्पेसिफिक फंड असेही म्हटले जाते.
डेट फंडांचेही असेच त्यांच्या सेक्युरिटी वाईज प्रकार आहेत. म्युच्युअल फंडांमध्ये हल्ली कमोडिटीज चा सुद्धा समावेश करण्यात आला आहे.
कमोडिटीज अर्थातच सोने, चांदी आणि इतर कमोडिटीज.
या कमोडिटीचा समावेश म्युच्युअल फंडांमध्ये डायव्हर्सिफिकेशन करण्यासाठी तसेच या कमोडिटीज च्या भावातील चढ-उताराचा फायदा युनिट होल्डर न मिळवून देण्यासाठी केला जातो.
म्युच्युअल फंडाचे काही प्रकार हेजिंग साठीही वापरले जातात. अरबीट्राज फंड हा त्यातलाच एक प्रकार आहे. अरबीट्राज फंड हे विविध एक्सचेंज मधील सिक्युरिटीच्या किमतीच्या फरकाचा फायदा घेण्यासाठी वापरले जातात.
थोडक्यात एका एक्सचेंज वर स्वस्त मिळणारा शेअर विकत घेऊन तो जास्त किंमत घेऊन दुसऱ्या एक्सचेंज वर विकला जातो यालाच अरबीट्राज असे म्हटले जाते.
वर सांगितलेल्या प्रत्येक फंडाचे फायदे वेगवेगळे आहेत. प्रत्येक प्रकारच्या फंडाची सविस्तर माहिती आपण पुढील लेखातून घेऊया.
■ ■ ■







## हसणे आणि हसू आणणे

आपण माणसाची व्याख्या करताना म्हणतो की मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे तसाच तो हसणारा सुद्धा प्राणी आहे कारण दुसरा कोणताही पशुपक्षी प्राण्यात अजून तरी हसता येत नाही तेव्हा आजच्या राष्ट्रीय दिनानिमित्त हास्यावर बोलू या. इथे एक गोष्ट लक्षात ठेवा जे शीर्षक मी दिले आहे ते म्हणजे हास्य व हसू आणणे यात फरक आहे ओढून ताणून ताणून हसू तोंडावर आणू नये दिलखुलास मनमोकळे असून ताण कमी करा आरोग्य सुधारा श्वसन वेदना प्रतिरोध शक्ती हसण्यातूनच येते म्हणून हास्य क्लब संघ बागेत आपण हसतो लहान पासून वृद्धापर्यंत हसणे स्वाभाविकच आहे, त्यामुळे मानसिक आनंद मिळून फील गुड हार्मोन्स, जसा लाडवाचा गोडवा येतो तसा आनंद मिळतो, हसण्याने नकारात्मकता कमी होते, घरातील समाजातील वातावरण बदलते. हा श्रीमंत टवटवीत चेहरे कोणत्याही घरात झोपडीत बंगल्यात व इतर ठिकाणी सरस्वती लक्ष्मी वास करतात असे वाटल्याशिवाय राहत नाही. स्वच्छ सुंदर हसणे पुरुषापेक्षा स्त्रियांना छान जमते म्हणून अकारण हसा सकारण हसा हसवा. कोणतीही गोष्ट, विनोद फक्त हसायचा म्हणून हसू नका असे सांगून हे हास्य पुराण थांबवतो व मी थांबतो शुभ दिवस स्टेफीट, तुमचा दिवस आनंदात जावो! गुड डे..!



# ग्राहक संरक्षण कायदा आणि ग्राहक...

ज्योतिर्मय साहित्य

कस्टमर ईज किंग (ग्राहक राजा आहे.), किंवा कस्टमर ईज गॉड. (ग्राहक देवआहे) अशी विशेषण ग्राहकाला लावली जातात. आणि दुसरीकडे अनेक प्रलोभन दाखवून ग्राहकांना आपल्या मालाचे, वस्तूंच्या खपासाठी आकर्षित केले जाते, आणि जाळ्यात ओढले जाते. आणि बऱ्याचदा अशा प्रलोभनांना ग्राहक बळी पडतो. .त्यातच त्याची फसवणूक केली जाते. पँन्ट वर शर्ट मिळणार अगदी फुकट .साडीवर साडी मिळणार अगदी फुकट.बाय वन गेट वन, एक वस्तू खरेदी केली तर एक फुकट, तर कधी विशिष्ट रकमेचा माल खरेदी केला तर कुपन मिळेल, त्याची सोडत निघणार त्यात हमखास बक्षिस मिळणारच. सोने खरेदीवर चांदीचे नाणे, किंवा गिफ्ट मिळणार, फ्लँट खरेदीवर टू व्हीलर मिळवा, अश्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर केल्या जातात आणि त्यालाच तुम्ही आम्ही भुलतो, आणि फसवणूक होते.

आज आपण बाजारपेठेत नजर टाकली तर जिकडे तिकडे आपल्याला मालाच्या जाहिरातीच जाहिराती बघायला मिळतात. कुठे मोठ्या प्रमाणावर अनेक वस्तूंचा सेल लागलेला असतो आणि त्यासोबत बक्षिसेही दिली जातात. एकूणच सध्याचा काळ हा स्पर्धेचा आहे, तसा जाहिरातीचाही आहे. जो तोआपला उत्पादित माल बाजार पेठेत कसा जास्त विक्री होईल या प्रयत्नात असतो. वर्तमानपत्राची बरीच पाने जाहिरातीने व्यापलेली असतात.

ग्राहक दिन साजरा करण्या मागचा उद्देश बघितला तर ग्राहकाची फसवणूक होवू नये, सेवा पुरवताना हलगर्जीपणा होवू नये म्हणून ग्राहकाला ग्राहक कायद्याची माहीती करुन द्यावी हाच मुळ उद्देश आहे.

१९६० मध्ये अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीत ग्राहक चळवळीचा मुद्दा उपस्थित झाला होता. अध्यक्ष केनेडी यांनी ग्राहकांच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी एक व्यासपीठ तयार केल. जागतिक पातळीवर पाठपुरावा केला गेला, त्याला युनेस्को कडून मान्यता मिळाली.आणि तदनंतर दरवर्षी १५ मार्च हा दिवस, ''जागतिक ग्राहक दिन'' म्हणून साजरा करण्याची प्रथा आहे.सर्वत्र तो साजरा केला जातो.

आपल्या देशात २४ डिसेंबर १९८६ मध्ये राष्ट्रपतींनी ग्राहक हक्क संरक्षण कायद्याला मंजुरी दिली. तेव्हा पासून ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला. व २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकास सहा प्रकारचे हक्क प्राप्त झाले आहेत.प्रत्येक ग्राहकास आपले हक्क माहीत असतील तर त्याची फसवणूक होणार नाही.

काय आहे हे हक्क?

१) सुरक्षेचा हक्कः- एखादी वस्तू खरेदी करतो,तेव्हा त्या वस्तूच्या सुरक्षिततेची हमी उत्पादकानी घेणे आवश्यक असते. जसे फ्रीज.टी.व्ही.वाँशिंग मशिन.मोटर बाईक,कार, फ्लॅट, कुठल्याही वस्तू.

२) माहितीचा हक्कः- आपण खरेदी करत असलेल्या वस्तूंच्या गुणवत्ते बद्दल माहिती विक्रेत्याने ग्रहकांना देणे बंधनकारक आहे. त्यात फसवणूक करु नये.

३) निवड करण्याचा हक्कः- विक्रेता एकाच प्रकारचे उत्पादन, वा ब्रँन्डचा आग्रह करु शकत नाही.निवडीचा अधिकार ग्राहकांना आहे.

४) म्हणणं मांडण्याचा हक्कः- ग्राहकाला आपली फसवणूक झाली वाटत असेल तर आपले म्हणणे,योग्य न्यायासाठी मांडण्याचा हक्क आहे.

५) तक्रार करण्याचा, तसेच तिचे निवारण्यासाठीचा हक्क : फसवणूक झाली असेल तर, न्यायासाठी तक्रार निवारण करुन घेण्यासाठी ग्राहक मंच,राज्य ग्राहक परिषदेत जाण्याचा हक्क आहे.

६) ग्राहकांचे हक्का विषयी शिक्षणाचा अधिकार. हक्कः- ग्राहकांना हक्क कर्तव्ये माहिती नसल्यामुळे बाजारपेठेत फसवणूक होते, ते समजण्यासाठी स्वयंसेवी संस्था, शासनाचे कडून जागो ग्राहक जागो सारखे उपक्रमा द्वारे प्रबोधन केले जाते.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वैद्यकीय सेवा या ''सेवेच्या'' व्याख्येत येतात आणि डॉक्टरांना ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत जबाबदार धरले जाऊ शकते.




सुधारित ग्राहक संरक्षण विधेयक ३० जुलै २०१९ लोकसभेत व सहा ऑगस्ट २०१९ राज्यसभेत मंजूर झाले.

९ ऑगस्ट रोजी राष्ट्रपतींची सही झाल्यावर २० जुलै रोजी ते लागू झाले, आता जिल्हा आयोग व राज्य आयोग अशी रचना आहे. जिल्ह्यात एक कोटी पर्यंत, राज्य दहा कोटी पर्यंत, व त्यावरील केंद्रीय आयोगाकडे दावे असतील. नवीन कायद्यात ऑनलाइन व टेलीशॉपिंग कंपन्यांचा समावेश आहे. खाद्यपदार्थ व पेय यात भेसळ असल्यास तुरुंगवास दंडाची तरतूद आहे. तक्रार कुठेही दाखल करता येते. दिशाभूल करणाऱ्या चुकीच्या जाहिराती देणारे आणि प्रसारीत करणाऱ्यांना दंड करण्याचा आयोगाला अधिकार आहे. दोन वर्षे तुरुंगवास व पन्नास लाख दंडाची तरतूद आहे.

ग्राहकांची फसवणूक झाली असेल तर त्याला न्याय हा मिळतोच, पण आपल्या हक्का सोबतच काही कर्तव्ये आहेत याची जाणीव सुद्धा ग्राहकांनी ठेवायला हवी.

काय आहे ती कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या?

कर्तव्ये आणि जबाबदारी

बाजारपेठेत एका उत्पादनासाठी अनेक उत्पादक असतात.त्यात स्पर्धा ही असणारच. फसव्या जाहिरातीला ग्राहकाने बळी पडू नये.

बऱ्याचदा धमाका सेल आँनलाईन खरेदीवर असतात,सणवारालाही डिस्काउंट सेल असतात,अशा वेळी न खपलेला,किंवा काही दोष असलेला माल असू शकतो. सावधपणे खरेदी करावी.

खरेदी करतांना मालाचे बिल आवश्यक आहे. बिलाचा आग्रह धरावा.न दिल्यास विक्रेत्याची तक्रार करावी.कारण माल दोषयुक्त असेल तर बिलाशिवाय आपण काहीच करु शकत नाही.

एम.आर.पी.(मँक्झीमम रिटेल प्राईज) पेक्षा जास्त किंमत देऊ नका.खरेदी करतांना ती बघा.

वस्तूंची मुदत तपासा. (एक्सपायरी डेट) ती संपली असेल तर वस्तू नाकारावी.अशा वस्तूचा वापर हानिकारक ठरु शकतो.




पेट्रोल भरतांना मीटरवर शून्या कडे लक्ष द्या.शुध्दते विषयी शंका असल्यास पुरवठा निरीक्षक,तहसीलदार यांचेकडे तक्रार करा.

सोने खरेदी वेळी हॉलमार्क कडे लक्ष द्या.

आँनलाईन खाद्य पदार्थ मागवताना योग्य काळजी घ्या.पदार्थ खराब आढळून आल्यास ताबडतोब तक्रार करावी.

ग्राहकांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून जिल्हा पातळीवर जिल्हा ग्राहकआयोग व राज्य पातळीवर राज्य ग्राहक आयोग कार्यरत आहेत. विनाशुल्क आपण तक्रार दाखल करु शकतो. केंन्द्रात राष्ट्रीय ग्राहक आयोग आहे. तर राज्यातील दुर्गम भागात ग्राहक उपाययोजनांसाठी ग्राहक कल्याण सल्लागार समिती आहे. याव्यतिरिक्त जागो ग्राहक जागो व कंझुमर क्लब आहेत.

गावपातळीवर ग्राहकांसाठी ग्राहक सेवा संस्था, ग्राहक पंचायत, प्रवासी संघ, कार्यान्वित आहेत.ग्राहकांवर अन्याय होऊ नये म्हणून त्या कार्य करतात.प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक तक्रार निवारण समिती आहे.या समितीत विविध विभागातील सदस्यांची निवड केली जाते. शासकिय सदस्य + अशासकिय सदस्य असतात.

काही वर्षांपासून शासनात ग्राहक संरक्षण विभागाची निर्मिती केली आहे.त्यासाठी स्वतंत्रपणे मंत्र्याची नेमणूक केली जाते.

शहरी,ग्रामीण भागात ग्राहकाचे हक्का रक्षण होणे त्याला न्याय मिळवून देण्यासाठी व्यवस्था असली तरी

ग्राहकास खूप काळ न्यायासाठी ताटकळत बसावे लागते.

अनेक ठिकाणी जिल्हा ग्रा.मंचावर अध्यक्ष नसतात.त्यांच्या नेमणूका लवकर होत नाही, तर कधी मंचाचे सदस्य नसतात.नव्वद दिवसांत न्याय मिळण्याचा हेतू साध्य होत नाही.शासनाचे दुर्लक्षच म्हणावे लागेल.

ग्राहकांच्या वाढत्या फसवणूकिचे प्रकाराला आळा बसावा म्हणून केंन्द्र सरकारने ''जागो ग्राहक जागो''अभियान सुरु केले आहे.बँका,सार्वजनिक वितरण, वीज,बांधकाम, अन्नौषध, पर्यटन, पोस्ट,अशा विविध प्रकारच्या खात्याच्या तक्रारी ह्या अभियानाच्या हेल्पलाइन(मदत सेवा प्रणाली) वर ग्राहक करु शकतो.

जागतिक ग्राहक दिन, राष्ट्रीय ग्राहक दिनाचे शासकिय पातळीवरून आयोजन केले जाते. त्यात औपचारिकता असते. काहीच ठिकाणचे अपवाद सोडले तर बहुतांशी उदासीनता असते.कार्यक्रमा संबंधित प्रसार, प्रचार व्हावा तो होत नाही.ठरावीकच लोकांना पत्रिका वाटून कार्यक्रम होतात. ज्यांना पत्रिका जातात ते कोणिही कार्यक्रमात नसतात.ही सत्यता आहे.कार्यक्रमास ग्राहकांची उपस्थिती चा अभाव असतो. बऱ्याचदा तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी, वेंडर, स्वस्तधान्य दुकानदार हेच उपस्थित असतात.दहापंधरा लोकांच्या उपस्थितीत कार्यक्रम उरकून घेतला जातो. फोटो प्रसिद्ध होतात. आत्मियतेने आयोजन अपेक्षित आहे ते केले जात नाही.

वास्तविक अशा कार्यक्रमात, वेगवेगळ्या खात्याचे अधिकारी, गँस एजन्सी, वजनमापांबाबत अधिकारी उपस्थिती हवी.ग्राहकांना ग्राहक संरक्षण कायदा समजवून सांगायला हवा ते होत नाही.कार्यक्रमात ग्राहकांची उपस्थिती वाढणे साठी प्रयत्न होत नाही.सालाबाद प्रमाणे कार्यक्रम साजरा करुन, वर्तमानपत्रात वृत्त प्रसिद्ध होते.यापलीकडे काही साध्य होत नाही.ते आपण दरवर्षी पहातोच. कार्यक्रम त्यांच्या पद्धतीने साजरे होतात. वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळते, त्यावर प्रतिक्रिया येतात, जैसे थे सुधारणा मात्र नाही.

शासनाने या बाबतीत योग्य ती दखल घेणे आवश्यक आहे. व त्यात सुधारणा घडवून आणायला हवी हे मात्र नक्कीच.

शेवटी एकच म्हणावे लागेल.कायद्याने ग्राहकांना हक्क, अधिकार दिले आहेत.ग्राहक म्हणून त्याचा कसा वापर करायचा ते आपणच ठरवायचे आहे. कारण...ग्राहक शक्ति + न्याय शक्ति + दंड शक्ती = शोषण मुक्ती हेच समीकरण आहे. न्याय मिळवण्यासाठी न घाबरता तक्रार करायलाच हवी.

ग्राहकाने त्यास दिलेल्या हक्काचा योग्य वापर करुन, आपली कर्तव्ये लक्षात ठेवून बाजारपेठेत जागृत राहून खरेदी करणेही अपेक्षित आहे, जेणे करुन तो फसवणुकीतून वाचू शकेल.

थोडक्यात राष्ट्रीय ग्राहक दिन,जागतिक ग्राहक दिन केवळ औपचारिकरित्या साजरे करून चालणार नाही, तर व्यापक प्रमाणावर ग्राहकचळवळ उभी राहाणे आवश्यक आहे.

***

# स्त्री सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

स्त्री, जगतजननी माता दुर्गा, अम्बा, भवानी, लक्ष्मी, सरस्वती, रेणुका, महाकाली, महागौरी अशा अनेक रुपात देवी प्रकटली आहे, नवरात्रीत देवीने नऊ रुपे धारण केली होती, तसेच चौसष्ट योगिनीच्या रुपात देवी आहे, देवी म्हणजे नारीशक्ती. सृष्टीची निर्माती जननी म्हणजे स्त्री. म्हणजेच नारी. आणि नरनारी या दोन शक्ती एकत्र येतात तेव्हाच निर्मिती होते. खरे तर या दोन्ही शक्ती समान महत्वाच्या आहेत, कारण त्या एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत, नारी कोमल सौन्दर्याचे, कोमल मायेचे वात्सल्यमयी प्रतीक तर, नर बलाढ्य शक्तीशाली कणखरतेचे रुप. या दोन्ही शक्ती महानच आहेत. परंतु नवनिर्मितीसाठी, प्रकृतीचा विकास करण्यासाठी नवजात बालकाचा वन्श सुखरुप वाढविण्यासाठी स्त्री ला मातृत्वाचे वरदान दिले. म्हणून स्त्री शक्ती म्हणजे वंश निर्मिती करणारी माता बनली. या शक्तीचा सन्मान करणे, आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य बनते. या आदिशक्तीने वेळोवेळी अनेक रुपातून पृथ्वीतलावरील लोकांनाच काय पण दैत्यशक्तीपासून देवतांनाही वाचविले आहे. अशा अनेक पौराणिक कथा वाचनात आल्या आहेत.

ज्या ज्या वेळी देवतांच्या कथा आई आजी सांगायच्या वाचून दाखवायच्या त्या त्या वेळी देवी कोणकोणती रुपे घेऊन अवतार घेत असत हे सगळे मनावर बिम्बवले जायचे. हीच देवीमाता, आदिमाता, जननी, अम्बाबाई, दुर्गा या रुपात येऊन तिने सृष्टीचे सौरक्षण केले आहे, प्रचंड उर्जास्रोत, सामर्थ्य, रणनीती, कौशल्य, वात्सल्य, प्रेम, माया, ममता, करुणा अशा नवरसाचे वरदान देवीमातेला मिळाले आहे.

त्या आदिशक्तीचा आपण यथोचित आदर तर करायलाच हवा आहे. तिला सन्मान देऊन आपण या शक्तीला जपले पाहिजे.

स्त्रीला कोणीही कमजोर समजू नये. प्रत्येक नारीकडे तिची स्वतःची अशी शक्ती असते. पूर्वीच्या काळी स्त्रियांना अबला,



असमर्थ, अशिक्षित अडाणी समजत असत, तिने फक्त रान्धा, वाढा, उष्टी काढा, पुरुषांची मर्जी सांभाळा, मुले सांभाळा, आतिथ्य करा अशी घरकामे करावी लागत असत. आणि काही जुन्या, खोडसाळ लोकांच्यात अजूनही या परंपरा चालू आहेत. अजून ही काही लोकांच्या घरात सुनेला फारशी किंमत दिली जात नाही. स्त्रीला सन्मान द्यायचा असेल तर आधी प्रत्येकाची तशी विचारसरणी बदलायला हवी आहे. पहिले म्हणजे शिक्षणाचा समान हक्क तिला द्यायला हवा आहे. सुशिक्षित स्त्री ही समाजाचे विकसित रुप आहे. तिला आदराचे, मानाचे, प्रेमाचे, मायेचे स्थान आणि सौरक्षण मिळाले पाहिजे. विश्वासार्ह वागणूक दिली गेली पाहिजे. स्त्री शिक्षणाची सुरुवात झाल्यापासून आता बहुतांशी सर्व च मुली, स्त्रिया शिक्षण घेऊ पहातात.



स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74088

परंतु काही ठिकाणी म्हणजे अगदी वधूपरीक्षेला येणारी मंडळी विचारतात मुलीचे वार्षिक उत्पन्न किती, घरकाम येते का? असले प्रश्न विचारणारी माणसे भेटली की, त्या घरात सुनेची काय किंमत केली जात असेल ते कळते. उदाहरणे अनेक आहेत, विषय वाढत जातो म्हणून थांबते. पण प्रत्येक घरात, समाजात स्त्री शक्तीचा आदर हा व्हायलाच हवा आहे. आपल्या ला जर सुंदर समाज

घडवायचा असेल तर प्रत्येक व्यक्ती चा योग्य तो आदर आपण ठेवायलाच पाहिजे. आणि हा समतोल सर्वांसाठी म्हणजे च स्त्री आणि पुरुष दोघांसाठी ही असेल. एकमेकांबद्दल उदात्त भावना ठेवणे हे सुसंस्कृतीचे लक्षण आहे. आपल्या भावना व्यक्त करताना त्यालाही एक ताळमेळ असायला हवा आहे. कारण आपल्या भाषाशैलीतूनही आपल्या ला काय म्हणायचे आहे, काय पटवून द्यायचे आहे हे कुशलतेने मान्डता आले पाहिजे. आणि खरे तर सन्मान हा प्रत्येक व्यक्तीला देता आला पाहिजे.

असो, निसर्ग नियमानुसार स्त्रियाना मर्यादशील वर्तनात, बंधनात रहावे लागते, ते अपरिहार्य आहे. पण आजची स्त्री ही सुशिक्षित, बुद्धिमान, चतुर, चौकस, सक्षम, सुसंस्कृत तर आहेच पण ती सुरक्षितही असायला हवी. तिच्यात धाडस, खम्बीरपणा आहे, लढवय्या वृत्तीही आहे. सन्मान मिळविण्याची क्षमताही आहे. समाजात वावरण्याचे धाडसही तिच्यात आहे. स्त्री पुरुष समानतेच्या काळात सन्मान मिळविण्याची स्त्रीची पात्रता आहे. काही अपवाद सोडले तल स्त्री ला समाजात सन्मान मिळत आहे हे आपल्याला नाकारता येणार नाही, आणि हा सन्मान कायमस्वरुपी ठेवायचा असेल तर समतोल राखणे आवश्यक आहे. शैक्षणिक, बौद्धिक वैचारिक आदरणीय स्त्री सन्मान लक्षात घेतला पाहिजे.

आजच्या विकसनशील काळात स्त्रियांनी आकाश झेपेइतकी प्रगती केली आहे, ती कोणीतरी सन्मान केल्यामुळेच. तेव्हा आपण स्त्रियांनीच एकमेकींना सन्माननीय मैत्रीचे, मदतीचे आव्हान स्विकारु.

सर्व मैत्रिणींना समर्पित.

****

# संगीता ठलाल ''ग्राहक मित्र गौरव पुरस्काराने'' सन्मानित

ज्योतिर्मय साहित्य

कुरखेडा:- १५ मार्च जागतिक ग्राहक दिनाचे औचित्य साधून गडचिरोली येथे शिवाजी महाविद्यालय सभागृहात ग्राहक पंचायत महाराष्ट्र, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार प्रशासन शाखा गडचिरोली शिवाजी महाविद्यालय, कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय गोकुळनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ''ग्राहक मित्र गौरव पुरस्काराचे आयोजन करण्यात आले होते.'' या भव्य अशा कार्यक्रमाचे मुख्य आयोजक अरूण पाटील मुनघाटे तसेच त्यांच्या टिमने केले होते. मूळ गाव देऊळगाव येथील व सध्या कुरखेडा येथे वास्तव्यास असणाऱ्या साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या, संगीता संतोष ठलाल यांची दैनंदिन साहित्य सेवा सोबतच नि:स्वार्थ सामाजिक कार्य बघून, एवढेच नाही तर मानवी जीवनासाठी तसेच मुक्या पशूंसाठी साहित्य क्षेत्रातील असा एकमेव पहिला संशोधन ''ग्रंथ रानभाज्यांच्या जगात'' लिहून




त्यांनी समाजासाठी फार मोठे समाजजागृतीचे कार्य केले आहेत. हेच त्यांचे समाजासाठी भरीव असलेले योगदानाबद्दल अरूण पाटील मुनघाटे यांनी संगीता ठलाल यांना फोन करून या पुरस्काराबद्दल निवड करण्यात आली असे कळवले होते. भव्य अशा कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते संगीता ठलाल यांना ''ग्राहक मित्र गौरव पुरस्कार'' देऊन सन्मानित करण्यात आले. अतिशय मानाचा पुरस्कार मानल्या गेलेल्या या पुरस्काराबद्दल सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांनी आपल्या मनोगतातून बोलताना म्हणाल्या की, समाजात असे कितीतरी लोक नि:स्वार्थ भावनेने,कशाचीही अपेक्षा न करता कार्य करत असतात पण,त्यांची दखल घेतली जात नाही. पण,आजही मा. अरूण पाटील मुनघाटे सरांसारखे व्यक्तीमत्व तळागाळातील कार्यकर्त्यांचा शोध घेऊन त्यांची दखल घेतात आणि समाजात त्यांची ओळख निर्माण करून देतात.सोबतच ''रानभाज्यांच्या जगात'' या संशोधन ग्रंथावर सुद्धा त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि मुख्य आयोजक मा. अरूण पाटील मुनघाटे आणि त्यांच्या संपूर्ण टिमचे आभार मानले. आणि सर्व पुरस्कार विजेत्यांना सुद्धा शुभेच्छा दिल्या. त्या शुभ प्रसंगी मंचावर उपस्थित असलेले प्रविण घाटे, कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्रतिभा पाटील, उद्घाटक माधुरी आटमांडे , रुपचंद फुलझेले,गोंविदराव बानबले,शरद पाटील ब्राह्मणवाडे, अरूण पाटील मुनघाटे,चंद्रशेखर भडांगे, कमलेश तुमसरे सोबतच सभागृहात, विविध क्षेत्रातील मान्यवर, शिवाजी महाविद्यालयातील कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्रीयश पॉलिटेक्निकमध्ये 'तक्ष्यंत्र: २०२६' राज्यस्तरीय तांत्रिक स्पर्धा उत्साहात संपन्न

## १५ पेक्षा अधिक महाविद्यालयांचा सहभाग; ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये भाग

ज्योतिर्मय साहित्य


छत्रपती संभाजीनगर - श्रीयश प्रतिष्ठानचे श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक), छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने पॉलिटेक्निक कॅम्पसमध्ये राज्यस्तरीय तांत्रिक स्पर्धा ''तक्ष्यंत्र: २०२६'' उत्साहात संपन्न झाली.

या कार्यक्रमामध्ये एकूण सहा तांत्रिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रोजेक्ट स्पर्धा, क्विझ स्पर्धा, पोस्टर सादरीकरण, टेकस्पार्क प्रोजेक्ट कॉन्सेप्ट, पॉवरपॉईंट प्रेसेंटेशन आणि इकॅड चॅलेंज या स्पर्धांचा समावेश होता. स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या महाविद्यालयांमधून जवळपास १५ पेक्षा अधिक महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. तसेच ६०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. सारंग कुलकर्णी आणि कर्नल जॉय डॅनियल यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच बक्षीस वितरण समारंभ प्रमुख पाहुणे श्री. हरिदास आलुरे यांच्या हस्ते पार पडला.

स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, रोख पारितोषिक आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व समन्वय स्टुडंट कौन्सिलच्या विद्यार्थ्यांनी केला.

या कार्यक्रमाचे संघटन सचिव म्हणून प्रा. गणेश काळे आणि प्रा. स्वाती शिराळे यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाचे संयोजकम्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. संदीप खंडागळे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमाचे श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरुळे यांनी कौतुक करून विद्यार्थ्यांना भविष्यात अशा उपक्रमांमध्ये अधिकाधिक सहभाग घेण्याचे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमाच्या



यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559